# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (REPRESENTATION) क्रमांक ६४ / २०२४

वीज देयकाबाबत

माधवराव फुलचंद दोरीक........................................................... अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, दोडांयचा (महावितरण) ..................... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- माधवराव फुलचंद दोरीक

प्रतिवादीतर्फे :- बी.पी. पाटील, कार्यकारी अभियंता, दोडांयचा विभाग
धनराज पाटील, उपकार्यकारी अभियंता, शिरपूर उपविभाग
भरत जाधव, उप प्रबंधक, दोडांयचा विभाग

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १६ एप्रिल २०२४

आदेश पारित दिनांकः- ३० एप्रिल २०२४

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, नाशिक परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक २९ डिसेंबर २०२३ रोजीच्या आदेशान्वये तक्रार फेटाळताना वीज देयकाची थकीत रक्कम ग्राहकाकडून नियमाप्रमाणे भरून घेऊन, त्याचा पुरवठा पूर्ववत करावा असे निर्देश दिले. सदर आदेशाविरूध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ रोजी दाखल केले.

विद्युत लोकपाल मुंबई म.वि.नि.आ.

२. अपिलार्थींच्या निवेदनातील व दिनांक १६ एप्रिल २०२४ रोजीच्या सुनावणी दरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी हे मुक्काम पोष्ट बलकुवे, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे येथील दिनांक २० ऑगष्ट २०११ पासून घरगुती ग्राहक (वीज जोडणी क्र.०९४०५०००४७२९) आहेत. अपिलार्थींच्या वीज देयकाची सांख्यिकीय माहिती खालीलप्रमाणेः

  तक्ता क्रं. १

| Consumer No. | Name | Address | Sanctioned load | Dae of Supply | Category |
|---|---|---|---|---|---|
| 094050004729 | Madhavrao Fulchand Dorik | At Balkuve, Tal: Shirpur | 0.46 KW | 20.08.2011 | Residential |

- अपिलार्थींनी नमुद केले की, त्यांचा मीटर घराच्या बाहेर, जेथे रिडींग घेणाऱ्या व्यक्तीला सुरळीत रिडींग घेता येईल, अशा ठिकाणी लावलेले आहे. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी रिडींग न घेता ऑक्टोंबर २०२१ या महिन्याचे ५७ युनीट वीज वापराचे फ्लॉल्टी स्टेटसचे रू.४३०/- चे फॉल्टी वीज देयक प्राप्त झाले व त्या वीज देयकाचा भरणा दिनांक १ नोव्हेंबर २०२१ रोजी केला. माहे नोव्हेंबर २०२१ या महिन्यात ऑक्टोंबर २०२१ मधील वीज वापराचे युनीटस समाविष्ट करून एकूण ९३ युनीट वीज वापराचे रू.६३०/- चे वाढीव वीज देयक आले.

- या संदर्भात अपिलार्थीने दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ रोजी महावितरण उपविभाग १ शिरपूर, धुळे येथे वीज देयक दुरुस्त करून मिळावे; तसेच, मानसिक व शारीरिक त्रासापोटी व आर्थिक नुकसानी पोटी रू.५०००/- मिळावे, अशी लेखी तक्रार केली. परंतू, उपकार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या तक्रारीचे निवारण न करता, माहे डिसेंबर २०२१ या महिन्यात रू.८९०/-चे जास्तीचे वीज देयक जारी केले. त्यानंतर अपिलार्थीने दिनांक १० डिसेंबर २०२२ रोजी माहिती अधिकारा अंतर्गत महावितरण कार्यालयाकडे अपिलार्थींच्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागितला. सदर अर्जाला महावितरणने, अपिलार्थींच्या तक्रारीचे निवारण झाले नाही, असे मोघम उत्तर दिले.

- महावितरणने दिनांक २ जून २०२२ रोजी अपिलार्थीस पत्र पाठवून नोव्हेंबर २०२१ चे आलेले जास्तीचे वीज देयकातील रू.३१८.६९ कमी करून डिसेंबर २०२१ चे सुधारीत वीज देयक देण्यात आलेले आहे असे कळविले. परंतू अपिलार्थीने महावितरणच्या निर्दशनास आणून दिले की, डिसेंबर २०२१ चे वीज देयक रू.८९०/- चे देण्यात आले आहे. तरी ऑक्टोंबर २०२१ या महिन्याचे वाढीव वीज देयकातून रू.३१८.६९ कमी करून रू.३१९/- येणे आहे व डिसेंबर २०२१

चे वीज देयक २५९.२८ इतके होते. या दोन्ही वीज देयकाची एकूण रक्कम रु.५८०/- येणे आवश्यक आहे. परंतू अपिलार्थीस मागील थकबाकी रु.६३४/- पुन्हा दाखवून त्यामध्ये डिसेंबर २०२१ चे वीज देयक २५९.२८ मिळवून रु.८९०/- चे वाढीव वीज देयक आकारले. त्यानंतर पुन्हा जानेवारी २०२२ च्या वीज देयकात रु.१८०/- कमी करुन रु.७१०/- चे वीज देयक आकारण्यात आले. महावितरणची वीज देयके या कालावधीत चुकीची आहेत असे ईमेलद्वारे त्यांना कळविले आहे. *[सीपीएलचा अभ्यास केला असता महावितरणची वीज देयके नोव्हेंबर २०२१ ते जानेवारी २०२२ या कालावधीत वीज देयके प्रणालीतर्फे योग्य पाठविण्यात आल्याचे दिसते]*

- त्यामुळे अपिलार्थीने दिनांक २७ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या ईमेल ने महावितरणच्या कार्यालयास वीज देयकाचे रु.५००/- चा भरणा करण्यास तयार असल्याचे कळविले. परंतू सदर ईमेलची महावितरणने दखल घेतली नाही. अपिलार्थीने त्यांच्यावर थकीत वीज देयकांचा आर्थिक भार होऊ नये म्हणून अपिलार्थी रु.८००/- चा भरणा करण्यास महावितरण कार्यालयात गेले व उर्वरीत रक्कम तक्रारीचे निवारण झाल्यानंतर भरेन असे सांगितले. पण महावितरण कार्यालयाने रु.८००/- भरुन घेण्यास नकार दिला व पूर्ण रक्कम भरण्यास सांगितले. त्यामुळे अपिलार्थीने दिनांक १८ एप्रिल २०२२ रोजी रु.८००/- ची मनीऑर्डर महावितरण कार्यालयास केली. तरीसुध्दा अपिलार्थींच्या तक्रारीचे निवारण झाले नाही.

- महावितरणने दिनांक २ जून २०२२ रोजीच्या ईमेलद्वारे अपिलार्थीची कोणतीही तक्रार शिल्लक नसल्याचे अपिलार्थीस कळविले परंतू ते खरे नाही. त्यानंतर अपिलार्थीने दिनांक ४ जून २०२२ रोजी च्या ईमेलने महावितरणला वीज देयके दुरुस्त करुन देण्याची विनंती केली.

- त्यानंतर प्रतिवादीने वीज कायदा २००३ च्या कलम ५६(१) नुसार १५ दिवसांत वीज देयक भरण्याची नोटीस दिली. तरी दिनांक १० मार्च २०२३ रोजी महावितरण कार्यालयास रु.५००/- ची मनीऑर्डर व सोबत नोटीसीची प्रत पाठवून तक्रार निवारण्याचे कळविले. परंतू महावितरण कार्यालयाने मनीऑर्डर न स्वीकारता परत अपिलार्थीस पाठवली. त्यानंतर अपिलार्थी दिनांक १७ मार्च २०२३ रोजी उपकार्यकारी अभियंता शिरपूर उपविभाग कार्यालयात जाऊन वीज कायदा २००३ च्या कलम ५६(१) च्या नोटीसी नुसार वीज देयकाची ५०% रक्कम रु.२५००/- भरण्यास तयार असून शिल्लक रक्कमेचे तक्रारीचे निवारण झाल्यावर भरणा करतो, असे सांगितले. पंरतू प्रतिवादीने पूर्ण रक्कमेचा भरणा करण्याचे सांगितले.

- दिनांक १६ मार्च २०२३ रोजीची नोटीस वायरमन गढरे यांच्या हस्ते आठ दिवस उशीराने दिनांक २४ मार्च २०२३ रोजी पाठविली व दिनांक २१ मार्च २०२३ रोजीचे पत्र तसेच वीज

देयक भरण्याची बिल पावती पाठवली व सोबत दिशाभुल करण्यासाठी व त्यांच्याविरुध्द मंचाकडे कोणतीही कायदेशीर कारवाई होऊ नये म्हणून वीज देयक दुरूस्तीचा बोध न होणारा खुलासा पत्र व दिनांक १५ मार्च २०२३ रोजी वायरमन गढरे यांनी स्थळ तपासणी पंचनामाची प्रत त्याच दिवशी देणे बंधनकारक असताना ती दिनांक २४ मार्च २०२३ रोजी दिली. दिनांक २७ मार्च २०२३ रोजी अपिलार्थी हे उपकार्यकारी अभियंता शिरपूर उपविभाग यांच्याकडे नोटीस घेऊन गेले व ५२% वीज देयक रक्कमेचा भरणा करण्यास तयार आहे असे सांगितले. परंतू उपकार्यकारी अभियंता शिरपूर उपविभाग यांनी त्याकडे दुर्लक्ष करून त्यांनी वायरमन गढरे यांना अपिलार्थींच्या घरी जाऊन त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्याचे सांगितले. तसेच वायरमन गढरे यांना वीज कायदा २००३ च्या कलम ५६(१) च्या नोटीसीनुसार वीज देयकाची ५०% रक्कम रू.२५००/- भरण्यास तयार असल्याचे सांगितले, वायरमन गढरे यांनीही अपिलार्थींचे काहीही एकुण न घेता वीज पुरवठा खंडीत केला व मीटर जमा केला.

- अपिलार्थीने पंजाब आणि हरयाणा हायकोर्ट यांचा दिनांक १९ डिसेंबर २०२२ चा निर्णय (ओमप्रकाश विरुध्द बलकारसिह आणि इतर (सी.आर.न.११५३-२०२२)) संदर्भीत केला आहे व वीज जोडणी ताबडतोब पूर्ववत करण्यात यावीत अशी विनंती केली .

- अपिलार्थीने नमुद केले की, कृती मानके विनियम २०२१ नुसार मानसिक व शारिरीक त्रास व कागदपत्राचा झालेले नुकसान या करीता म्हणून रू.१०,०००/- व वीज जोडणी पुन्हा चालू करून मिळावी अशी मागणी केली आहे.

३. प्रतिवादीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १६ एप्रिल २०२४ रोजीच्या सुनावणी दरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थी हे मुक्काम पोष्ट बलकुवे, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे येथील दिनांक २० ऑगष्ट २०११ पासून घरगुती ग्राहक (वीज जोडणी क्र.०९४०५०००४७२९) आहेत. त्याची सांखिकीय माहिती तक्ता क्रं.१ मध्ये नमुद केली आहे.

- अपिलार्थींना ऑक्टोबर २०२१ या महिन्यामध्ये मीटर रिडर एजंन्सीच्या नजर चुकीमुळे ५७ युनीटसचे फॉल्टी स्टेटसचे रू.४३०/- वीज देयक पतिवादीने जारी केले आहे. त्या वीज देयकाचा भरणा अपिलार्थीने दिनांक १ नोव्हेंबर २०२१ रोजी केला. माहे नोव्हेबर २०२१ मध्ये ९३ युनीटसचे (ऑक्टोबर २०२१ व नोव्हेबर २०२१) चे संचीत वीज देयक रू.६३०/- चे जारी केले.

- अपिलार्थीने दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ रोजी ऑक्टोबर २०२१ या महिन्याचे वीज देयकाची दुरूस्ती करून मिळावे म्हणून तक्रार अर्ज दाखल केला. अपिलार्थीच्या मीटरची स्थळ तपासणी केली असता मीटर चालू असल्याचे निदर्शनास आले व अपिलार्थीचा भार हा २ एलइडी बल्ब, १ फॅन, १ टिव्ही व इतर स्वीच असल्याचे निदर्शनास आले.

- अपिलार्थीच्या वीज देयकाचे बिलींग प्रणालीद्वारे दुरुस्ती करुन (ऑक्टोबर २०२१ व नोव्हेबर २०२१ या महिन्याच्या वीज देयकांची दुरुस्ती करुन) रु.३१८.६९ चे वीज देयक कमी झाले. तथापि त्यापुर्वीच डिसेंबर २०२१ या महिन्यात रु.८९३/- चे वीज देयक प्रोसेस झाले होते. त्यामध्ये मागील थकबाकी रु.६३४/- ची होती. वीज देयक दुरुस्तीचे क्रेडीट रु.३१८.६९ जानेवारी २०२२ मध्ये देण्यात आले. अपिलार्थीनी दिनांक १ नोव्हेबर २०२१ नंतर कोणतेही वीज देयक भरले नाही. त्यामुळे अपिलार्थीची थकबाकी प्रत्येक महिण्यात वाढत गेली.

- अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात दिनांक १० डिसेंबर २०२१ रोजी माहितीच्या अधिकारात वरील सुधारीत वीज देयकाची माहिती दिनांक २७ जानेवारी २९२२ पत्रान्वये कळविली आहे. तसेच अपिलार्थीचे वीज देय ऑक्टोबर २०२१ चे रु.१०२/- सोडून बाकीचे रु.३१८.६९ चे क्रेडीट देण्यात आले हे समजू देण्यात आले. तरी सुध्दा अपिलार्थी हे समजुन घेण्याच्या मनस्थितीत नव्हते.

- अपिलार्थीने रु.८००/- ची (पार्ट पेमेंट) मनी ऑर्डरने पाठविली असता दिनांक २२ एप्रिल २०२२ मध्ये वीज देयकात समायोजीत करून घेण्यात आली.

- प्रतिवादीने दिनांक २ जून २०२२ च्या पत्रान्वये तक्रारीचे निवारण झाले आहे व कोणतीही तक्रार प्रलंबित नाही तसेच वीज देयकाचा भरणा करून सहकार्य करावे असे अपिलार्थीस कळविले.

- असे असूनही अपिलार्थीने त्याच त्याच विषयावर वारंवार इमेलने तक्रारी दाखल केल्या व सदर तक्रारींचे वेळोवेळी निवारण केलेले आहे, तसे उपविभाग कार्यालय शिरपूर यांनी अपिलार्थीस लेखी कळविले आहे.

- प्रतिवादीने नमुद केले की, वीज ग्राहकांना वीज देयकांचा भरणा सुलभ रितीने करता यावा म्हणून महावितरणने अधिकृत ऑनलाईन प्रणालीतील लिंक ग्राहक सेवा केंद्रे, मध्यवर्ती बँक इत्यादी ठिकाणी भरणा केंद्र उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत, तरी सुध्दा, अपिलार्थीने वीज देयकाचा थकीत रक्कमेचा भरणा मनीऑर्डर द्वारे करण्याचा प्रयत्न केला, परंतू प्रतिवादीने सदर रक्कम ही थकीत देयकाची निम्मे (पार्ट पेमेंट) असल्याने, अपिलार्थीस ती परत करण्यात आली.

- अपिलार्थीचा वीज पुरवठा माहे सप्टेंबर २०२२ मध्ये ताप्तुरत्या स्वरूपात खंडीत केला, त्यानंतर सुध्दा अपिलार्थीने माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये अनधिकृतरीत्या वापरल्याचे त्या मीटरवर सीपीएल नुसार दिसते.

- दिनांक १७ मार्च २०२३ रोजी अपिलार्थीच्या समक्ष संपूर्ण दस्तऐवज सादर करण्यात आले होते त्यात तक्रारीचे निवारण (वीज देयकाची दुरूस्ती) कसे करण्यात आले. तसेच, अपिलार्थीचे यात कुठल्याही प्रकारचे आर्थिक नुकसान झालेले नाही, याचा, सविस्तर खुलासा करण्यात आलेला आहे. तरीदेखील अपिलार्थी वीज देयकांचा भरणा पार्ट पेमेंट पध्दतीने करण्यास आग्रही होते. त्यानंतर, सदर तक्रारीचे अचूक निवारण झालेले आहे म्हणून थकीत वीज देयकाची पूर्ण रक्कम भरणे बंधनकारक आहे अशी अपिलार्थीस विनंती करण्यात आली. तरीसुध्दा अपिलार्थी हे कायदयाचा गैरवापर करत नुकसान भरपाईची मागणी करणे, अपिलार्थीच्या तक्रारीकडे जाणून बुजून दुर्लक्ष केल्याचे नमुद करणे, निषेध म्हणून पार्ट पेमेंटची मनीऑर्डर पाठवित एकाच विषयावर वारंवार तक्रारी दाखल करून प्रतिवादी महावितरणच्या कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण करत आहेत.

- परिणामी थकीत वीज देयकांचा पूर्ण रक्कमेचा भरणा करण्यात यावा यासाठी अपिलार्थीस वीज कायदा २००३ च्या कलम ५६(१) नुसार थकबाकीबाबत १५ दिवसांची कायदेशीर नोटीस दिनांक ३ मार्च २०२३ रोजी देण्यात आली. अपिलार्थीने रू.५००/- मनी ऑर्डरने पाठविले होते, परंतू ती रक्कम अतिशय कमी असल्यामुळे परत पाठविण्यात आली.

- अपिलार्थीने दिनांक ५ एप्रिल २०२३ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली, सदर तक्रारीवर मंचाने त्याच्या दिनांक २९ डिसेंबर २०२३ रोजीच्या आदेशान्वये वीज देयकाचा भरणा करण्याचे निर्देश दिले.

- एप्रिल २०२४ मध्ये अपिलार्थी रू.६९४०/- इतके थकबाकीदार होते व अपिलार्थीचा वीज पुरवठा कायमस्वरूपी खंडीत करण्यात आला.

- मीटर रिडींग बाबतच्या चुकीबद्दल मीटर रिडींग एजन्सीवर दंडात्मक कारवाई करण्यात आली व नंतर सदर एजन्सीचा मीटर रिडींगचा करार संपुष्टात आणला आहे.

- प्रतिवादी महावितरणने अपिलार्थीच्या वीज देयकांची दुरुस्ती करून देण्यात आलेली असून त्यांच्या प्रत्येक तक्रारीचे निवारण करण्यात आलेले आहे. तसेच, अपिलार्थीचे यात कुठल्याही

प्रकारचे आर्थिक नुकसान झाले नाही. त्यामुळे अपिलार्थीने थकीत वीज देयकाचा भरणा करून महावितरण कंपनीस सहकार्य करावे ही मागणी अभिवेदनात केली आहे.

विश्लेषण व निर्णय

४. दोन्ही पक्षकारांचे म्हणने ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्राचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थीच्या वीज देयकांची माहिती, तक्ता क्रं.१ मध्ये नमुद केली आहे. अपिलार्थीच्या सीपीएलचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस खालीलप्रमाणे वीज देयके देण्यात आल्याचे दिसते.

तक्ता क्रं. २

| Month | FY 2021-22 | | | | FY 2022-23 | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Initial Reading (KWH) | Current Reading (KWH) | Consumption (Units) | Status | Initial Reading (KWH) | Current Reading (KWH) | Consumption (Units) | Status |
| April | 841 | 873 | 32 | Normal | 1285 | 1336 | 51 | Normal |
| May | 873 | 919 | 46 | Normal | 1336 | 1388 | 52 | Normal |
| June | 919 | 974 | 55 | Normal | 1388 | 1448 | 60 | Normal |
| July | 974 | 1023 | 49 | Normal | 1448 | 1500 | 52 | Normal |
| August | 1023 | 1089 | 66 | Normal | 1500 | 1539 | 39 | Normal |
| Sept. | 1089 | 1145 | 56 | Normal | 1539 | 1633 | 94 | Normal |
| Oct. | **1145** | **1145** | **57** | **Faulty** | 1633 | 1705 | 72 | Normal |
| Nov. | 1145 | 1238 | 93* | Normal | 1705 | 1742 | 37 | Normal |
| Dec. | 1238 | 1265 | 27 | Normal | 1742 | 1769 | 27 | Normal |
| Jan. | 1265 | 1270 | 5 | Normal | 1769 | 1802 | 33 | Normal |
| Feb. | 1270 | 1273 | 3 | Normal | 1802 | 1819 | 17 | Normal |
| March | 1273 | 1285 | 12 | Normal | 1819 | 1849 | 30 | Normal |

| Month | FY 2023-24 & 2024 -25 | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Initial Reading (KWH) | Current Reading (KWH) | Consumption (Units) | Status | Remarks |
| April | 1849 | 1849 | 0 | Normal | |
| May | 1849 | 1849 | 54 | Inaccessible | |
| June | 1849 | 1849 | 0 | Normal | |
| July | 1849 | 1849 | 0 | Normal | |
| August | 1849 | 1849 | 0 | Normal | |
| Sept. | 1849 | 1849 | 0 | Normal | T.D. |
| Oct. | 1849 | 1860 | 11 | Normal | T.D. |
| Nov. | 1860 | 1860 | 0 | Normal | T.D. |
| Dec. | 1860 | 1860 | 0 | Normal | T.D. |
| Jan. | 1860 | 1860 | 0 | Normal | T.D. |
| Feb. | 1860 | 1860 | 0 | Normal | T.D. |
| March | 1860 | 1860 | 0 | Normal | T.D. |
| April | 1860 | 1860 | 0 | | P. D. |

| | |
|---|---|
| Note : | *Accumulated consumption for 2 months |
| | $ Supply was temporary disconnected on Sept. 2023 |
| | # Supply was permanently disconnected in April 2024 |
| | The faulty bill of October 2021 was revised and credit of Rs. 318.69 was given in the bill of January 2022. |

५. अपिलार्थीने नमुद केले की, वीज देयक योग्य रित्या दुरूस्त झाले नाही म्हणून थकबाकी वाढली. अपिलार्थीने वेळोवेळी काही प्रमाणात वीज देयकाचा पार्ट पेमेंट भरण्याचा प्रयत्न केला. तथापि प्रतिवादीने त्यास योग्य तो प्रतिसाद दिला नाही.

६. प्रतिवादीने नमुद केले की, दोन महिन्याचे संचीत वीज देयक दुरूस्ती करत असताना फिक्स चार्जेस वजा करून सुधारीत वीज देयक देण्यात आले आहे व ते नियमाप्रमाणे बरोबर आहे. सदर बाब अपिलार्थीस वारंवार समजवून सांगून सुध्दा अपिलार्थी या छोटया छोटया गोष्टीचे भांडवल करून जाणीवपुर्वक वीज देयक भरण्याचे टाळाटाळ करून प्रतिवादीचा वेळ घेतात. वीज देयक एजन्सीवर फॉल्टी वीज देयक दिल्याबद्दल सिस्टीमतर्फे दंड ठोठवण्यात आला आहे, आणि परत अशी चूक न करण्याबाबत सक्त ताकीद देण्यात आली होती.

७. ऑक्टोबर २०२१ ते जानेवारी २०२२ या कालवधीच्या अपिलार्थीच्या वीज देयकाचा रक्कमेचा तक्ता खालीलप्रमाणे.

| Month | Current bill (Rs.) | Previous arrears (Rs.) | Bill Revison adjustment (Rs.) | Total Bill (Rs.) | Payment (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| Oct. 2021 | 430 | | | 430 | Rs. 430/- paid on 01.01.2024 |
| Nov. 2021 | 630 | | | 630 | Nil |
| Dec. 2021 | 259.28 | 634.22 | nil | 893.50 | Nil |
| Jan. 2022 | 136.28 | 896.87 | (-)318.69 | 714.46 | Nil |
| Note: | Minor Changes are in arrears amount due to interest accrued by the System | | | | |

ही सर्व वीज देयकें बरोबर आहेत. अपिलार्थीच्या म्हणण्यात काही तथ्य आढळत नाही. माहे ऑक्टोबर २०२१ चे रू.४३०/- एकमेव वीज देयक चुकीचे गेले होते. सदर चुकीची दुरूस्ती जानेवारी २०२२ मध्ये योग्य रित्या दिली आहे. या एकमेव वीज देयकासाठी खूप मोठया प्रमाणात पत्र व्यवहार झाल्याचे निदर्शनास येते. अपिलार्थीने सुध्दा सबुरीने घेऊन सकारात्मक दृष्टीकोन ठेवला असता तर सर्व टाळता आले असते.

८. वरील सर्व बाबीचा सर्वांगीन विचार करता अपिलार्थीचे वीज देयक योग्य रित्या दुरूस्त करून देण्यात आले आहे. असे असूनही सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन प्रतिवादीना खालील प्रमाणे आदेशीत करण्यात येत आहे.

- वीज देयकात आकारण्यात आलेले व्याज व विलंब आकार ऑक्टोबर २०२१ पासून वीज पुरवठा कायमस्वरूपी खंडीत केले तोपर्यंत माफ करावे आणि अपिलार्थीस सुधारीत वीज देयक देण्यात यावे.

- अपिलार्थीने सुधारीत वीज देयक ताबडतोब एक महिण्याच्या आत एक रकमी भरावे व नवीन वीज जोडणीसाठी लागणाऱ्या अनामत रक्कमेचा भरणा नियमानुसार अपिलार्थीने करण्यात यावा.
- सुधारीत वीज देयक भरल्यानंतर अपिलार्थीची वीज जोडणी सर्वीस कनेक्शन चार्जेस न आकारता चालू करावी.
- अपिलार्थीने सुधारीत वीज देयक न भरल्यास प्रतिवादीना नियमानुसार कारवाई करू शकतील.
- आदेशाच्या दिनांकापासून दोन महिण्याच्या आत अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा
- अपिलार्थीच्या इतर मागण्या नामंजूर करण्यात येत आहेत.
- अपिलार्थीचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

खरी प्रत असल्याचे प्रमाणित
श्री. डी. एस. इंबरे
सचिव
म.वि.नि.आ.

सही/-
वंदना कृष्णा
विद्युत लोकपाल (मुंबई)